# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

Dr. Priya Gedam
Director Students' Development(I/c.)
Ph. No. - 07132-223320

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
Email : nssdsw.gug@ gmail.com


पत्र क्र. No.GU/DSW / 123/2017 Dt: 16/09/2017

प्रति,

१. मा. प्राचार्य, संलग्नित सर्व महाविद्यालये
२. मा. विभागप्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**विषय : विद्यार्थी आर्थिक सहायता निधी (२०१७–२०१८) मधून आर्थिक मदतीकरिता विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पाठविण्याबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयातील गरीब, गरजू पात्र विद्यार्थ्यांना विद्यार्थी आर्थिक सहायता निधी मधून शिक्षण घेण्यासाठी बस पास सवलत खर्च, परिक्षा शुल्क, वसतीगृहातील राहण्याचा व जेवणाचा खर्च, पुस्तकांचा व इतर शैक्षणिक साहित्यांची खरेदी यासाठी नियमावलीनुसार आर्थिक मदत देण्याची तरतुद करण्यात आली आहे. याबाबतची नियमावली व विहित आवेदनपत्र विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

आपणांस विनंती आहे की, विद्यार्थी आर्थिक सहायता निधीची नियमावली प्रवेशित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावी. सदरहु निधीतुन आर्थिक मदत घेण्यासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र विहीत नमून्यात आवश्यक कागदपत्रांसह नियमावलीनुसार भरुन व स्वतः प्रमाणित व साक्षांकीत करुन संचालक विद्यार्थी कल्याण यांचेकडे दि. ३० जानेवारी २०१७ पर्यंत पाठवावे. **३१ जानेवारी २०१८** ही आवेदनपत्रे स्विकारण्याची अंतीम तारीख असून या तारखेनंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत केले जाणार नाहीत. तसेच आवेदनपत्र अपूर्ण भरलेले असल्यास किंवा आवेदनपत्रासोबत आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे साक्षांकीत करुन न पाठविल्यास संबंधितांचे अर्ज अमान्य केले जातील याची कृपया नोंद घ्यावी. कृपया अर्ज संचालक विद्यार्थी कल्याण यांचे कार्यालयातच सरळ सादर करावे.

धन्यवाद!

16/09/2017
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
(डॉ. प्रिया गेडाम)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीची नियमावली

### १) विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी व्यवस्थापन समिती

विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीची व्यवस्था, प्रशासन, देखरेख व वितरण विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी व्यवस्थापन समितीच्या अधिपत्याखाली करण्यात येईल, ही समिती खालील प्रमाणे राहील.

१. कुलगुरु किंवा त्यांचा नामित प्रतिनिधी (पदसिध्द अध्यक्ष)
२. व्यवस्थापन परिषदेव्दारे नामित केलेले दोन विभागप्रमूख व संलग्नित महाविद्यालयाचा एक प्राचार्य.
३. विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष (पदसिध्द सदस्य)
४. विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा सचिव (पदसिद्‌ध सदस्य)
५. वित्त व लेखा अधिकारी (पदसिद्‌ध सदस्य)
६. संचालक, विद्यार्थी कल्याण (पदसिध्द सदस्य)
७. कुलसचिव (सदस्य सचिव)

### २) ध्येय व उद्दीष्ट्ये

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या सर्व संलग्नित, संचालीत तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना गंभीर स्वरुपाचा अपघात अथवा मोठ्या आजारात वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक सहाय्य करणे.

### ३) निधी संकलन

संलग्नित/संचालीत महाविद्यालयांचे तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील प्रवेश विद्यार्थ्यांकडून दरवर्षी प्रत्येकी रु. ५/– प्रमाणे निधी संकलित केला जाईल.

### ४) निधीचे व्यवस्थापन

सदर निधी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये कुलसचिवांचे नांवे बचत खाते उघडून जमा करण्यात येईल. तसेच ह्या खात्याचे आर्थिक व्यवहार कुलसचिव आणि वित्त व लेखा अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने केले जातील. तसेच सदर निधीचे लेखापुस्तके वित्त व लेखा शाखेत हाताळली जातील.

### ५) सचिवांचे कर्तव्ये

सदर निधी समितीचा व निधी संबंधीचा पत्रव्यवहार/अभिलेख सचिवांव्दारे किंवा त्यांनी प्राधीकृत केलेल्या अधिकाऱ्याव्दारे हाताळला जाईल. तसेच समितीने विहित केल्याप्रमाणे इतर कर्तव्ये सचिवांना पार पाडावी लागतील.

### ६) विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीतून आर्थिक सहाय्य मंजूर करण्याचे नियम व कार्यपध्दती.

अ) सदर निधीतून आर्थिक सहाय्य प्राप्त करण्यासाठी अर्जदाराच्या कुटूंबाचे एकुण वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/– पेक्षा जास्त नसावे. यासाठी उत्पन्नाचे प्रमाणपत्र शासनाने प्राधीकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याकडुन आवेदन पत्रासह जोडावे लागेल.

ब) विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी समितीव्दारे विहित केलेल्या आवेदन पत्रात सदर निधीतून आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करणे व त्यानुसार आर्थिक सहाय्य मंजूर करण्याचे अधिकार समितीला राहतील. समितीचा निर्णय अर्जदारासाठी अंतिम राहील.

क) समितीला आवश्यक वाटल्यास संबंधीत अर्जदाराला आवश्यक कागदपत्रासह मुलाखतीसाठी बोलविण्याचे अधिकार समितीला राहतील. परंतु यासाठी येणारा प्रवास खर्च संबंधीत अर्जदाराला करावा लागेल.

ड) विद्यापीठाव्दारे संचालीत/संलग्नित महाविद्यालयाचे व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे नियमित विद्यार्थी अर्ज करण्यासाठी पात्र राहातील. या संदर्भात प्राचार्याचे बोनाफाईड प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

इ) अर्जदाराला विद्यापीठाव्दारे विहित केलेल्या आवेदनपत्रात अर्ज करावा लागेल तसेच आवेदन पत्रासह संबंधीत अर्जदारांनी ज्या हॉस्पीटलमध्ये उपचार घेतले असतील त्या हॉस्पीटलच्या प्राधीकृत व नोंदणीकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र जोडावे लागेल. व प्रमाणपत्रासह उपचारासाठी आलेल्या बाबनिहाय खर्चाचा तपशिल प्रमाणित करुन द्यावा लागेल. तसेच सोबत बाबनिहाय खर्चाच्या पावत्या सादर कराव्या लागतील. आवश्यकतेनुसार विद्यापीठ वैद्यकीय अधिकाऱ्याचे अभिप्राय मागविण्यात येतील.

फ) विहित आवेदन पत्रांसह आवश्यक कागदपत्रे न जोडल्यास व आवेदन पत्र परिपूर्ण न भरल्यास असे आवेदन पत्र रद्दबातल केले जातील.

ग) सदर निधीसाठी केलेले सर्व अर्ज प्राचार्य/विभाग प्रमुखाच्या शिफारसीसह संचालक, विद्यार्थी कल्याण, गोंडवाना विद्यापीठ यांचेकडे सादर करावे लागेल. विद्यार्थी किंवा त्याच्या पालकांकडून थेट परस्पर केलेला अर्ज किंवा पत्रव्यवहार स्विकारल्या जाणार नाही.

ह) आर्थिक सहाय्याबाबत केलेल्या अर्जातील माहिती व त्यासंबंधी प्रमाणपत्रे/कागदपत्रे खोटी किंवा बनावट आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. चौकशी अंती खोटी माहिती व कागदपत्रे सादर करुन आर्थिक निधी प्राप्त केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत विद्यार्थ्याचा निधी परत करणे बंधनकारक राहील. तसेच अशा विद्यार्थ्यावर शिस्तभंगात्मक व पोलीस कार्यवाही घेण्यासंबंधी योग्य निर्णय घेण्याचा अधिकार समितीचा राहील. यासंबंधीचा समितीचा निर्णय अंतिम राहील.

ट) तसेच सदर विद्यार्थ्यांनी चालु शैक्षणिक सत्रात प्रवेशित अभ्यासक्रमाच्या परिक्षेसाठी परिक्षा आवेदनपत्र भरल्याचे प्राचार्य/विभागप्रमूखांना प्रमाणित करावे लागेल.

ठ) सदर निधीसाठी चालु शैक्षणिक सत्रात आवेदन पत्र स्विकारण्यात येतील व मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये समितीची सभा घेवून प्राप्त अर्जाची छाननी, निवड प्रक्रिया व मंजूरीची कार्यवाही करण्यात येईल. संबंधीत विद्यार्थ्याचे धनादेश छाननी व निवड प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत संबंधीत प्राचार्य/विभागप्रमूखांस वित्त व लेखा विभागाव्दारे पाठविले जातील.

ढ) सदर निधीसाठी केलेले सर्व अर्ज प्राचार्य/विभागप्रमूखामार्फत प्राप्त होणे आवश्यक आहे. कोणतेही अर्ज किंवा पत्रव्यवहार थेट विद्यार्थ्यांना करता येणार नाही.

त) सदर निधीतून कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती दिली जाणार नाही. सदर निधीच्या नियमावलीत वेळोवेळी बदल करण्याची शिफारस करण्याचे अधिकार समितीला राहील.

थ) अर्जदार जर रुग्णालयात भरती असेल, तर त्या रुग्णालयाचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्रस्तावीत खर्च प्रमाणीत करुन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. अर्जदाराला उपचार मिळाल्यानंतर झालेला खर्च वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रमाणीत केलेल्या पावतीसह सादर करावा लागेल.

द) अर्जदाराने किंवा त्याच्या पालकाने दुसऱ्या कोणत्याही शासकीय/अशासकीय कार्यालये, विमायोजना इत्यादीकडून सदर वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती प्राप्त केली नाही किंवा त्यासाठी आवेदन केले नाही असे प्रतिज्ञापत्र अर्जदाराच्या पालकाला अर्जासह सादर करावे लागेल.

ध) विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीचा धनादेश लाभार्थी विद्यार्थ्याच्या नांवाने देण्यात येईल. परंतु मदत निधी प्रदान करण्यास विलंब झाला व त्याआधीच विद्यार्थ्याचे निधन झाले अशा स्थितीत धनादेश विद्यार्थ्याच्या आई/वडील यांच्या नांवे देण्यात येईल.

न) विद्यार्थ्याला अपघात झाला असल्यास पोलीस रिपोर्टची प्रत जोडणे आवश्यक राहील.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी — आवेदन पत्र :

सत्र २०...... — २०......

१. आवेदकाचे पूर्ण नांव श्री/श्रीमती/कुमारी : ..................................................

२. अ) शैक्षणिक विभागाचे/महाविद्यालयाचे नांव : ..................................................

ब) अभ्यासक्रमाचे नांव व वर्ग : ..................................................

३. अ) कायमचा पत्ता : ..................................................

..................................................

..................................................

ब) स्थानिक पत्ता : ..................................................

..................................................

..................................................

४. अ) वडीलांचे/पालकाचे पुर्ण नांव व पत्ता : ..................................................

..................................................

..................................................

५. आई, वडीलांचे/पालकाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न (सर्व मार्गांनी मिळून) (टिप: सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेले मागील वर्षाच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्राची प्राचार्य/विभागप्रमुखाव्दारे साक्षांकित केलेली प्रत सोबतच्या प्रपत्रासह जोडावी.) : ..................................................

..................................................

६. आई, वडीलांचे/पालकाचे आर्थिक मिळकतीचे साधन काय आहे ? (शासकीय नोकरी/खाजगी नोकरी/व्यवसाय/शेती/या शिवाय इतर) : ..................................................

..................................................

अ) आई व वडील/पालक शासकीय/खाजगी नोकरी करीत असल्यास धारण केलेले पद, कार्यालयाचे नांव व पत्ता : ..................................................

..................................................

..................................................

मागील आर्थीक वर्षात मिळालेले एकुण वेतन (वेतना संबंधी नियोक्त्याने दिलेले प्रमाणपत्र अर्जासह जोडणे अनिवार्य आहे)

ब) आई व वडील/पालक व्यवसाय करीत असल्यास व्यवसायाचे स्वरुप व पत्ता : ..................................................

..................................................

..................................................

व्यवसाय जिथे सुरु असेल तेथील वार्डाचे नगरसेवक/नगर परिषद सदस्य/सरपंच यांचे व्यवसायाच्या स्वरुपाबाबतचे व व्यवसायातून मागील वर्षी प्राप्त झालेल्या वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे)

क) आई व वडील/पालक शेती करीत असल्यास स्वत:च्या मालकीची एकुण किती एकर जमीन आहे ? कुठे आहे याबाबतचा तपशिल तसेच शेतीतून मागील वार्षिक मिळालेले एकुण उत्पन्न :......................................................
:......................................................

७. (शेतीच्या मालकी संबंधी ७/१२ च्या उताऱ्याची प्रत व मागील वार्षिकशेती व्दारे काढलेले पीक व याव्दारे मिळालेले एकुण वार्षिक उत्पन्न या संबंधी सरपंचाचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे) :......................................................
......................................................

८. अ) शासकीय/खाजगी शिष्यवृत्ती अथवा इतर आर्थिक सवलती मिळते काय? :......................................................
......................................................

मिळत असल्यास त्या शिष्यवृत्तीचे आर्थिक सवलतीचे नांव :......................................................

ब) अर्जदाराला इ.बी.सी. सवलत मिळते काय? :......................................................

मिळत नसल्यास त्यासंबंधीची कारणे :......................................................

क) शिष्यवृत्ती/आर्थिक सवलत मिळत असल्यास सदर आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची कारणे :......................................................

९. शैक्षणिक पात्रता

अ) मागील उत्तीर्ण परिक्षेचे नांव :......................................................

ब) उत्तीर्ण झाल्याचे वर्ष :......................................................

क) प्राप्त गुणांची शेकडेवारी :......................................................

(गुणपत्रिकेची प्रमाणित प्रत सोबत जोडावी)

१०.अ) सोबतच्या अनुक्रमांक १ ते ७ बाबी पैकी कोणत्या बाबीकरिता विद्यार्थी वैद्यकीय निधीतुन मदत हवी आहे त्या बाबीसमोर ; ☆ ) खुण दर्शवावी त्याचा तपशिल रकाना क्र. ११ मध्ये दर्शवावा. १. अपघात.२. जळणे. ३. क्षय रोग ७. अपंगत्व ४. कोणत्याही प्रकारचा कर्करोग/ट्युमर ५. हृदयरोग ६. किडनीचे आजार व सुरक्षितता मदतीकरिता १ ते ४ बाबींपैकी कोणतीही एक बाब.

११. विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीतुन अपेक्षित आर्थिक मदतीचा तपशिल :

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | अर्जदाराने केलेला एकुण खर्च | विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीतुन मागणी केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय खर्च | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| | एकुण | | |

## वैद्यकीय मदत निधी करीता प्राप्त – आवेदन पत्रासोबतच्या आवश्यक कागदपत्राची

## तपासणी पत्र

१. अर्जदाराचे नांव : ..............................................................................................................

२. अर्जदाराचे आई/वडील/पालक यांचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/– पेक्षा जास्त आहे काय? होय/नाही

३. २०१....–२०१....वर्षाचा उत्पन्नाचा दाखला जोडला आहे काय? होय/नाही

४. मागील वर्षी उत्तीर्ण पदवी परिक्षेची साक्षांकित गुणपत्रिका जोडली आहे काय? होय/नाही

५. चालु शैक्षणिक वर्षात प्रवेशित अभ्यासक्रमाच्या परिक्षेचा अर्ज भरल्याची परिक्षा शुल्क पावती सोबत सादर केली आहे काय? होय/नाही

६. अर्जदाराने इतर शिष्यवृत्ती स्विकारल्याबाबत स्तंभ क्र. ८ मध्ये नमुद केले काय? होय/नाही

७. विद्यार्थ्याने द्यावयाच्या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी केली आहे काय? होय/नाही

८. पालकांनी द्यावयाच्या प्रतिज्ञापत्रावर पालकाने स्वाक्षरी केली आहे काय? होय/नाही

९. विभागप्रमुख/प्राचार्य यांनी द्यावयाच्या प्रतिज्ञापत्रावर विभागप्रमुख/प्राचार्य यांनी स्वाक्षरी केली आहे काय? होय/नाही

१०. सदर अर्जासोबत जोडावयाच्या स्तंभ क्र. १० व ११ मधील १, २, ३ नुसार पावत्या विभागप्रमुख/प्राचार्य यांनी प्रमाणित केलेल्या जोडल्या आहेत काय? होय/नाही

११. अर्जदाराला फ्रिशिप/ईबीसी/पीटीसी किंवा इतर सवलत मिळते काय? होय/नाही

१२. वरील प्रमाणे तपासणी केलेला अर्ज नियमावलीनुसार विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी समिती समोर छानणी करीता ठेवण्यास पात्र आहे काय? होय/नाही

संबंधीत लिपीकाची स्वाक्षरी

## प्राचार्य/विभागप्रमुखांचे प्रमाणपत्र

१. असे प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ..................................................हया/हे आमच्या महाविद्यालयात/विभागात .......................... या अभ्यासक्रमात शिकत असून त्यांनी वैद्यकीय मदत निधीतुन मदत मिळण्यासाठी केलेल्या आवेदन पत्रातील रकाना क्र. १ ते १० मध्ये नमूद केलेली माहिती कार्यालयीन अभिलेखानुसार बरोबर आढळली आहे.

२. सदर विद्यार्थ्यांच्या आई/वडील/पालकांचे सर्व मार्गांनी मिळणारे २०....... — २०..... वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,०००/— पेक्षा जास्त नसून त्याप्रित्यर्थ सदर विद्यार्थ्यांनी सादर केलेले सक्षम अधिकाऱ्याचे वार्षिक उत्पन्नाचे मुळ प्रमाणपत्र तपासून त्याची झेरॉक्स प्रत माझ्याव्दारे प्रमाणित करण्यात आली आहे. तसेच स्तंभ क्र. ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नोकरी/व्यवसाय/शेती बाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

३. सदर विद्यार्थ्यांना कोणत्याही स्वरुपाची शिष्यवृत्ती किंवा आर्थिक सवलत मिळत नसून त्यासाठी त्यांनी अर्ज केलेला नाही.

४. सदर विद्यार्थ्यांना ................................................... ही शिष्यवृत्ती/आर्थिक सवलत मिळत असून त्यासाठी त्यांनी अर्ज केला आहे. (लागु नसल्यास खोडावे)

५. सदर विद्यार्थ्याने दिलेल्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती साक्षांकीत करुन अर्जासह जोडल्या आहेत.

६. विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीच्या नियमावलीनुसार सदर निधीतून मदत मिळण्यासाठी अर्जदार हा पूर्णपणे पात्र आहे. त्यामुळे त्यास वैद्यकीय मदत निधी योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य मंजूर करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

दि. ..............................

...................................
विभागप्रमुख/प्राचार्यांची सही व शिक्का

१२. मागणी केलेली एकुण रक्कम ..........................................................................

टिप :— १. वरील खर्चाबाबतच्या प्राचार्य/विभागप्रमुखाव्दारे साक्षांकित केलेल्या मुळ पावत्याच्या झेरॉक्स प्रती अर्जासह जोडण्यात याव्या.

२. वैद्यकीय खर्चाबाबत शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा नोदणीकृत डॉक्टरचे प्रमाणपत्र व औषधी खरेदी बाबतच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती प्राचार्य/विभागप्रमुखाव्दारे साक्षांकित करुन अर्जासह द्याव्या.

३. विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी व्यवस्थापन समितीला आवश्यक वाटल्यास वरील खर्चाच्या मुळ पावत्या तपासणीसाठी मागवू शकतात. त्यामुळे मुळ पावत्या संबंधीत विद्यार्थ्यांनी व्यवस्थित जपून ठेवाव्यात.

## विद्यार्थ्याचे प्रतिज्ञा पत्र

मी प्रतिज्ञापुर्वक नमूद करतो/करते की, वरील आवेदन पत्रातील सर्व विधाने व माहिती सत्य आहे. वरील विधाने व माहिती असत्य/खोटी सिध्द झाल्यास मी विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीची पूर्ण रकम परत करेन व असत्य/खोटी माहिती सादर केल्याबाबत शिस्तविषयक व इतर दंडात्मक कारवाईस मी पात्र ठरेल.

............................

दि. : ......................    आवेदकाची स्वाक्षरी

## पालकाचे प्रतिज्ञा पत्र

मी श्री/श्रीमती ..........................................................................................अर्जदाराचा वडील/आई/पालक प्रतिज्ञापुर्वक नमूद करतो/करते की, ............................वर्षात माझ्या कुटुंबीयांचे सर्व मार्गानी मिळणारे माझे वाषिक उत्पन्न हे रु. १,००,०००/— पेक्षा जास्त नाही. याबाबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या वार्षिक उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची प्राचार्य/विभागप्रमुखाव्दारे साक्षांकित केलेली प्रत तसेच स्तंभ क्र. ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नोकरी/व्यवसाय/शेती बाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

............................

आई/वडील/पालकाची स्वाक्षरी
किंवा डाव्या हाताचा अंगठा

दि. .......................

विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी खालील प्रकारच्या आजारावरील उपचाराकरिता देण्यात येईल.

१. अपघात.
२. जळणे.
३. क्षय रोग.
४. कोणत्याही प्रकारचा कर्करोग/ट्युमर
५. हृदयरोग
६. किडनीचे आजार
७. अपंगत्व.

खालीलपैकी कोणत्याही एका बाबीकरिता सुरक्षितता मदत देण्यात येईल.

| | |
|---|---|
| १. नैसर्गिक /अपघाती मृत्यु. | जास्तीत जास्त रु. २५०००/– |
| २. दोन पाय किंवा दोन हात किंवा दोन डोळे कमी होणे | जास्तीत जास्त रु. २००००/– |
| ३. एक पाय किंवा एक हात किंवा एक डोळा कमी होणे | जास्तीत जास्त रु. १००००/– |
| ४. व्हृदय शस्त्रक्रिया | जास्तीत जास्त रु. २००००/– |

विद्यार्थी वैद्यकीय मदत निधीच्या उपलब्धतेनुसार प्राप्त अर्जामधून सुरक्षितता मदत लाभ देण्याचा निर्णय निधी व्यवस्थापन समिती घेईल.

वैद्यकीय मदत निधी रकमेची मर्यादा

१. जास्तीत जास्त रु. २५,०००/– किंवा वैद्यकीय उपचारासाठी झालेला एकुण खर्च यापैकी जी रक्कम कमी असेल ती देण्यात येईल. विद्यार्थ्याचे निधन झाल्यास वैद्यकीय मदत निधी देण्याचा अधिकार व्यवस्थापन समितीला राहील.
२. संबंधीत शैक्षणिक वर्षात प्राप्त झालेल्या एकुण निधीतील शिल्लक व उपलब्धता विचारात घेवून विशेष बाब म्हणून अपवादात्मक प्रकरणात रकमेत वाढ करण्याचा अधिकार समितीचा राहील.

डॉ. ईश्वर एस. मोहुर्ले
संचालक विद्यार्थी कल्याण

डॉ. विनायक एस. ईरपाते
कुलसचिव

डॉ. मुरलीधर जी. चांदेकर
कुलगुरु व अध्यक्ष